दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता




लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 1 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 246 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# लाडकी बहीण योजनेत ४,८०० कोटींचा घोटाळा
# सुप्रिया सुळे यांचा महायुती सरकारवर आरोप

## अदिती तटकरेंवर थेट आरोप टाळले; कोकाटेंच्या राजीनाम्याचीही केली मागणी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सुमारे ४ हजार ८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. प्रस्तुत घोटाळ्यासाठी संपूर्ण राज्य सरकार जबाबदार असून, या घोटाळ्याची एसआयटी चौकशी झाली पाहिजे, असेही त्या म्हणाल्यात. यावेळी त्यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याचीही मागणी केली.सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी सकाळी नवी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण तथा कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावरील आरोपांसह विविध मुद्यांवर भाष्य केले. त्या म्हणाल्या, आई-वडिलानंतर भाऊ-बहिणीचे नाते हे सर्वात पवित्र असते. पण महाराष्ट्र सरकारने या नात्याचाही अवमान केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत ४ हजार ८०० कोटींचा घोटाळा झाला. त्यामुळे सरकारने या योजनेची श्वेतपत्रिका काढावी, संपूर्ण व्यवहाराचे ऑडिट करावे व या प्रकरणाची एसआयटी चौकशी करावी. हा तपास अत्यंत पारदर्शक पद्धतीने झाला पाहिजे. सरकारने या प्रकरणी चौकशी केली नाही तर आम्ही हा विषय संसदेत मांडून केंद्राकडे या योजनेच्या चौकशीचा आग्रह धरू.





### अदिती तटकरेंवर थेट आरोप टाळले

सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या महिला व बालविकास विभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, पण मंत्री अदिती तटकरे यांच्यावर थेट आरोप करणे टाळले. त्या म्हणाल्या, सरकारचा दावा आहे की त्यांचा महिला विभाग सर्वोत्तम आहे, तर मग इतक्या मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार कसा झाला? या योजनेच्या अंमलबजावणीत चुकीच्या पद्धती वापरल्या गेल्या असतील, तर त्याला संपूर्ण सरकार जबाबदार आहे.मी अदिती तटकरे यांच्यावर आरोप करणार नाही. परंतु योजने च्या अंमलबजावणीत पुढाकार घेणारे मंत्री व उपमुख्यमंत्री यांना याची जबाबदारी घ्यावी लागेल.

### पुरुषांच्या खात्यावर पैसे कसे गेले? उत्तर द्या

राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार राज्यातील २ कोटी ३८ लाख महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला. त्यातील २६ लाख अर्थात १० टक्के महिला पहिल्या टप्प्यात विधानसभा निवडणूक झाल्यानंतर अपात्र ठरवण्यात आल्या. या योजनेत पुरुषांनीही लाभ घेतल्याचे समोर आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, बँकेचे डिटेल्स आदी पुरावे लागतात. मग या पुरुषांच्या खात्यावर पैसे कसे गेले? याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल, असे त्या म्हणाल्या.एखाद्या महाविद्यालयात कमी गुण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे फॉर्म रिजेक्ट होतात. विमान योजनेसाठी शेतकरी अर्ज भरतात ते ही रद्दबातल होतात. मग लाडकी बहीण योजनेत पुरुषांनी भरलेले अर्ज का रद्द झाले नाहीत? डिजिटल इंडियाच्या तंत्रज्ञानात ही चूक कशी झाली? विधानसभा निवडणुकीच्या ३ महिने अगोदर ही योजना आणली गेली. त्यानंतर सर्वांना लाभ देण्यात आले. मग त्यांना आत्ताच अपात्र का ठरवले गेले? हा थोडा थोडका नव्हे तर तब्बल ४ हजार ८०० कोटींचा भ्रष्टाचार आहे, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या बीड तालुकाध्यक्षपदी जिया भाई शेख यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

सन २००८ सालापासून दिवंगत गोपीनाथराव मुंडे साहेबांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे जिया भाई शेख यांची भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या बीड तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे याबद्दल जिया शेख यांचे पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून अभिनंदन होत असून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहे.

जिया भाई शेख हे मुंडे साहेबांच्या हयातीत आणि त्यांच्या मृत्यू पश्चात सुद्धा मुंडे भगिनी आणि भाजप सोबत एकनिष्ठतेने कार्य करीत आहेत. त्यांच्या कार्याची व एकनिष्ठतेची दखल घेत राज्याच्या पर्यावरण मंत्री



मा.नामदार पंकजाताई मुंडे, माजी खासदार प्रितमताई मुंडे, केज मतदार संघाच्या दबंग आमदार नमिताताई व अक्षयजी मुंदडा आणि केज मतदार संघाचे किंग मेकर म्हणून जिल्हाभर प्रसिद्ध असलेले नंदकिशोर (काकाजी) मुंदडा व युवकांचे हृदयसम्राट युवा नेते पनगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षयजी नंदकिशोर मुंदडा, भाजप जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख, तालुकाध्यक्ष राणा दादा डोईफोडे यांच्या आदेशाने

भा.ज.प. अल्पसंख्यांक मोर्चा बीड तालुका अध्यक्षपदी जिया भाई शेख यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल पक्षीय पातळीसह समाजातील नागरिकांकडून अभिनंदन होत असून पुढील कार्यासाठी हृदय शुभेच्छा दिल्या जात आहे याबद्दल जिया भाई शेख यांनी सर्व अभिनंदनकर्त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहर पोलीस स्टेशन येथे रक्तदान शिबीर संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या अनुषंगाने बीड शहर पोलीस स्टेशन येथे आज रक्तदान शिबिर घेण्यात आले होते या शिबिरामध्ये एकूण ३१ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. या रक्तदान शिबिरात विशेष म्हणजे पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांनी आणि अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर यांनी रक्तदान केले. त्यांच्यासोबत बीड शहर चे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ आणि इतर अधिकारी आणि अंमलदार यांनी सुद्धा रक्तदान केले.





यावेळी बोलताना श्री नवनीत काँवत त्यांनी सांगितले की, थोर पुरुषांच्या जयंती साजरी करत असताना सर्वांनीच लोकाभिमुख उपक्रम राबवणे गरजेचे आहे. आपण बऱ्याचदा थोर पुरुषांचे जयंती उत्सव राबवत असताना आपण सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेपासून दूर जात आहोत. थोर पुरुषांची शिकवण आपण विसरत चाललो आहोत असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच याप्रसंगी त्यांनी सांगितले की, लोकांनी स्वतःहून पोलिसांना समाजात काही चुकीची घडत असलं त्याची माहिती द्यायला पाहिजे जेणेकरून पोलिसांना त्यावर चांगले काम करता येईल. याप्रसंगी सहभागी झालेल्या लोकांचे कौतुक करून त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. सदरील कार्यक्रमात पोलीस स्टेशन बीड शहर च्या ११ अंमलदार यांनी रक्त दान केले तसेच या रक्तदान कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहभाग नोंदवला.

## विधिज्ञ साहित्य संमेलनात ॲड.प्रबोधन निकाळजे यांनी समता बंधुता गीत केले सादर;गीत सोशल मिडियावर लोकप्रिय

**आष्टी । प्रतिनिधी**

छ. संभाजीनगर मराठवाड्याच्या भूमीवर नुकतेच इतिहास घडवणारे भारतातील पहिले विधिज्ञ साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनात विवेक विचार मंचचे मराठवाडा विभाग संयोजक व आष्टी येथील तरूण वकील ड. प्रबोधन निकाळजे यांनी स्वतः रचलेले आणि गायलेले समता बंधुता गीत सादर करत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पित करून भावपूर्ण अभिवादन केले. या गीतास सध्या सोशल मिडियावरून मोठा प्रतिसाद मिळत असून अनेकांनी याचे स्वागत केले आहे.

या ऐतिहासिक संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सर्वोच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती श्री. प्रसन्न वराळे हे उपस्थित होते. संमेलनाचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त मा. न्यायमूर्ती श्री. अभय ओक यांच्या हस्ते झाले. तसेच प्रथम सत्राचे अध्यक्ष मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती श्री. मनिष पितळे हे होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीने संमेलनाचा वैचारिक आणि न्यायवैधानिक दर्जा अधिक उंचावला. पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज या संस्थेच्या वतीने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजनात ड. संजीव देशपांडे, ड. अनिल गोळेगावकर, ड. संभाजी टोपे तसेच संभाजीनगर उच्च न्यायालय वकील संघातील अनेक विधिज्ञ यांचा मोलाचा सहभाग होता.विधिज्ञ साहित्य संमेलनाच्या निमित्ताने कायदा, साहित्य आणि सामाजिक समतेच्या विचारांचा सुंदर संगम घडून आला. समता बंधुता गीत हे याचे प्रमुख आकर्षण ठरले आहे.



## पोलिस प्रशासनास मनमोकळेपणाने आपले काम करू द्यावे-स्वप्नील उनवणे पोलिस निरीक्षक,केज

**केज । प्रतिनिधी**

केज येथून अमर राजाभाऊ देडे नामक व्यक्तीने एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडल्यानंतर केज पोलिस स्टेशनला या संबंधीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.




दहा दिवस उलटून गेल्यामुळे मुलीचा व सबंधित व्यक्तीचा ठावठिकाणा मिळत नसल्यामुळे तपास कशा पद्धतीने सुरू आहे याची विचारपूस करण्यासाठी दि.३१ जुलै रोजी मुलीच्या नातेवाईकांनी केज पोलिस स्टेशनला मोठ्या संख्येने हजेरी लावली असता,पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे साहेबांनी आपल्या कर्मचाऱ्यांना काही निर्देश दिले. दररोज नियमित तपास करणे,उत्कृष्ट पद्धतीने तपास मार्गी लावणे, पीडितेच्या नातेवाईका बद्दल सहानुभूती असणे,फक्त रक्त नात्याच्या व्यक्तींनाच तपासाची नियमित माहिती देणे आवश्यक असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.त्याच प्रमाणे अशापरिस्थितीत इत्तर लोकांनी येऊन राजकीय भाषेत पोलिस कर्मचाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास पोलिस प्रशासनाला मुक्तपणे काम करण्यास अडथळे निर्माण होत असून अशा प्रकारचे अडथळे निर्माण होऊ नयेत याची सर्वांनी काळजी घ्यावी व सहकार्याच्या भावनेतून पोलिस प्रशासनास मनमोकळे पणाने आपले काम करू द्यावे असे आवाहन देखील केले आहे.

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती निमित्त राज्यभर उत्सव साजरा करण्याचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांचे सन २०२५हे सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी ७५०वी जयंती वर्ष असून,येत्या गोकुळ अष्टमी दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांची ७५० वी जयंती साजरी होणार आहे.या निमित्ताने महाराष्ट्र शासनाने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करण्याचे आदेश दिले आहेत.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर परिषदा यांनी संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमा किंवा मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढून सार्वजनिक रीतीने हा महोत्सव साजरा करावा,असे स्पष्ट करण्यात आले आहे.नागरीस्थानिक स्वराज्य संस्थांनी या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि उत्सवाच्या आयोजनात आवश्यक ती दक्षता घ्यावी,असेही शासनाच्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.शासनाने या संदर्भातील अधिकृत परिपत्रक दि.३० जुलै २०२५ रोजी जाहीर केले असून,नगरविकास विभागाचे अपर सचिव अनिलकुमार आर.उगले यांच्या सहीने हे परिपत्रक प्रसारित करण्यात आलेले आहे.उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सज्ज राहावे आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या कार्याचा गौरव करावा असे आवाहन करण्यात आले आहे.दरम्यान या शासन निर्णयाचे समस्त ब्राह्मण संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.धनंजय कुलकर्णी यांनी स्वागत केले असून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उप मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,उप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे आभार मानले आहेत. या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.



संपादकीय

# शाळांच्या इमारतींचा धोका




बालकांना कळत्या वयापासूनच शालेय जीवनाशी समरस व्हावे लागते. एकेकाळी उजवा हात डाव्या कानाला लागल्याशिवाय मुलांना शाळेमध्ये मुख्याध्यापक प्रवेश देत नसत. त्यामध्ये मुलाचे वय सहा वर्षे पूर्ण झाले असल्याचा व बालक शिक्षणासाठी योग्य झाल्याचा निष्कर्ष तत्कालीन शिक्षण विभागाकडून काढण्यात येत असे. बालवाडी, पहिली ते दहावी हे शहरी भागात, तर ग्रामीण भागात बालवाडीऐवजी अंगणवाडी असे. मुलांच्या आयुष्यात शाळेचे महत्त्व वेगळेच असते. भवितव्य घडविण्यासाठी पालक आपल्या मुलांना शाळेमध्ये पाठवत असतात. शाळा मग त्या खासगी असोत की सरकारी. त्या कायमच सुस्थितीत असावयास हव्या. सरकारी शाळांची जबाबदारी प्रशासनाची, तर खासगी शाळांची जबाबदारी ही त्या त्या संस्थाचालकांची असते. शाळा दुरवस्थेत असतील, शाळांची बांधकामस्थिती धोकादायक असेल व डागडुजीकडे, देखाभालीकडे लक्ष दिले जात नसेल, तर कधी ना कधी दुर्घटना ही होणारच. यंत्रणांच्या, सरकारच्या उदासीनतेची किंमत मोजावी लागणारच. नेमका हाच प्रकार शुक्रवारी सकाळी राजस्थानमध्ये पाहायला मिळाला.

राजस्थानमधील झालावाड येथे एका सरकारी शाळेच्या इमारतीचे छत कोसळल्याने ७ मुलांचा मृत्यू झाला, ९ जण गंभीर जखमी झाले. झालावाडच्या मनोहरथाना ब्लॉकमधील पिपलोडी सरकारी शाळेतील एका वर्गात मुले बसली होती, तेव्हा खोलीचे छत कोसळले आणि त्याखाली ३५ मुले गाडली गेली. घटनास्थळी पोहोचलेल्या ग्रामस्थांनी तत्काळ ढिगारा उपसून मुलांना बाहेर काढले आणि रुग्णालयात दाखल केले. मनोहरथाना रुग्णालयाच्या म्हणण्यानुसार ५ मुलांचा जागीच मृत्यू झाला, तर २ मुलांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सरकारी शाळांमध्ये गरीब वर्गातील मुले शिक्षणासाठी येत असतात. खासगी शाळांतील महागडे शिक्षण परवडत नसल्याने अल्प, अत्यल्प उत्पन्न गटातील नागरिक आपल्या मुलांना शिक्षणासाठी सरकारी शाळेत पाठवत असतात. सरकारी शाळांची जबाबदारी पूर्णपणे सरकारवर असल्याने शाळांची डागडुजी, देखभाल, शाळांची बांधकाम अवस्था याकडे वेळोवेळी लक्ष देणे हे त्या त्या प्रशासनाचे कर्तव्य असते. राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये शाळांसाठी रकमेची तरतूदही करण्यात येते. मग त्या निधीचा वेळोवेळी विनीयोग करून शाळा सुस्थितीत ठेवण्यासाठी प्रशासनाने प्राधान्य देणे आवश्यक आहे. राजस्थानमध्ये घडलेल्या दुर्घटनेतील शाळेचे छत बऱ्याच काळापासून जीर्ण झाले होते. तरीही याकडे दुर्लक्ष करण्यात आले, निष्पाप मुलांना आपला जीव गमवावा लागला. तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी धोकादायक शाळांची यादी नुकतीच जाहीर केली होती आणि विशेष म्हणजे या धोकादायक शाळांच्या यादीमध्ये झालावाड गावच्या शाळेचा समावेश नसावा, हीच संतापजनक बाब आहे. ज्या शाळेची अवस्था जीर्ण झाली आहे, बांधकाम धोकादायक अवस्थेत आहे, त्या शाळेचा जिल्हाधिकाऱ्यांनी धोकादायक यादीमध्ये समावेश करू नये, यावरून धोकादायक शाळांची यादी किती गंभीरपणे बनविली असेल, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. 'पुढच्यास ठेच, मागचा शहाणा' या उक्तीप्रमाणे महाराष्ट्र सरकारने राज्यात अशी घटना कुठेही घडू नये, यासाठी तत्काळ पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्र सरकारने तातडीने पावले उचलत राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कंबर कसली आहे. राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर यांनी एका उच्चस्तरीय बैठकीत राज्यातील सर्व सरकारी शाळांचे सुरक्षा ऑडिट करण्याचे आणि धोकादायक इमारतींना तातडीने निधी देण्याचे निर्देश दिले. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील अनेक शाळांच्या स्थितीची माहिती उजेडात येईल.जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांचे बांधकाम जुने झाले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटत चालल्याने व शाळा बंद पडत असल्याने शाळांच्या सुस्थितीकडे, डागडुजीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत चालले आहे, हे नाकारता येणार नाही. अधिकांश शाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी असल्याने शाळेतील जे वर्ग सुस्थितीत आहेत, त्याच वर्गांमध्ये शाळा चालविली जात आहे. ग्रामीण भागात खासगी शाळा जिल्हा परिषद शाळांच्या तुलनेत सुस्थितीत आहेत. त्यांना स्पर्धेत टिकायचे असल्याने व विद्यार्थ्यांना शालेय प्रवेशासाठी आकर्षित करायचे असल्याने या शाळांची डागडुजी व देखभाल सातत्याने करण्यात येत असते. आदिवासी भागातील, दुर्गम डोंगराळ भागातील खासगी शाळांचे चित्र सुखद नाही. तेथील विद्यार्थी संख्या घटल्याने संस्थाचालकांच्याही भूमिकेत बदल झाला. त्यांना सरकारकडून भुईभाडे, वीज देयक व अन्य निधी मिळत असल्याने व संस्थाचालकांच्या घरातील तसेच आप्तस्वकीयांचा बिगर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये समावेश असल्याने त्यांना शाळा चालविणे भाग आहे. राजस्थानच्या घटनेमुळे देशाच्या शालेय वर्तुळामध्ये खळबळ उडाली असली तरी या घटनेपासून प्रत्येक राज्याने बोध घ्यायला हवा. दुर्घटना घडल्यावर चार दिवस चर्चा करून, शोक व्यक्त करून घटना विसरून जाणे योग्य नाही. शाळांच्या बांधकाम दर्जाबाबत उदासीनता कायम राहिल्यास अशा घटनांना भविष्यातही निमंत्रण मिळतच राहणार. खरी गरज आहे ती, सरकारी शाळांच्या डागडुजीची. गरिबांची मुले तिथे शिक्षण घेत असल्याने शाळेच्या दुरवस्थेबाबत ते लोक सहसा आवाज उठवत नाहीत. मुलांना शिक्षण मिळतेय ना, यावरच ते समाधान मानतात. धोकादायक शाळांमध्ये मुले असुरक्षित आहेत. हेही त्यांच्या निदर्शनास येऊ नये, ही शोकांतिकाच आहे. सरकारी शाळांच्या अवस्थांबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांनीही जागरूक राहणे आवश्यक आहे.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे विचार आपल्या समोरील आजची आव्हाने!


**माझी मैना गावावर राहिली ! माझ्या जीवाची होती या काहीली'!!. या कवणाद्वारे आपले महाराष्ट्र प्रेम व निष्ठा व्यक्त करणारे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे. अशा साहित्य रत्नाचा जन्म वाटेगाव जि. सांगली येथे १ ऑगस्ट १९२० रोजी भाऊ साठे यांच्या कुटुंबात झाला. त्यांचे नाव 'तुकाराम' असे ठेवण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरु संत तुकाराम महाराज यांच्या नावावरून त्यांचे नाव ठेवले गेले. घरात ते थोरले असल्यामुळे लहान भाऊ आणि बहीण त्यांना अण्णा असे संबोधित असत. वाटेगाव हे औंध संस्थानात होते , तेव्हा दलितांच्या मुलांना वेगळी शाळा होती. शिक्षक सवर्ण असल्यामुळे ते दलित मुलांना दूरवर बसूनच त्यांच्या पाठीवर धडे देत असत. पहिल्या दिवशी गिरवणयासाठी दिलेली काही मुळाक्षरे दुसर्या दिवशी अण्णांनी पाठीवर लिहिलेले नव्हते. म्हणून मास्तरांनी अण्णांना फार मोठी शिक्षा केली. त्या दिवसापासून अण्णांनी शाळेकडे पाठ फिरवली.**

मातंग समाजाला त्याकाळी पिढी जात गुन्हेगारी म्हणून संबोधिले असल्यामुळे दारिद्र्य आणि गुन्हेगारी अशा दोन्ही संकटाचा सामना करावा लागला. १९२५ मध्ये गुन्हेगार जमातीच्या वसाहतीचा कायदा संमत झाला व तो मातंग समाजावर लादला गेला. कुठे काही घडले की मातंग समाजाच्या घरांची झाडाझडती घेतली जात असे . जोपर्यंत गुन्हेगार सापडत नाही तोपर्यंत मातंग समाजातील पुरुषांना सळो कि पळो करून सोडत असत .अशा परिस्थितीत अण्णांच्या कुटुंबात माणसांची संख्या अधिक असल्यामुळे उपासमारी ही नित्याचीच बाब होती.

म्हणून वडिल भाऊ साठे यांनी उदरनिर्वाहासाठी मुंबईला जाण्याचे ठरविले .परंतु पैशाच्या अडचणी असल्यामुळे वाटेगाव ते मुंबई हे अंतर पायी चालून गेले. मिळेल ते काम करू लागले. अण्णाभाऊ यांचे चुलत बंधू ज्ञानदेव यांची भेट मुंबईला झाली. ज्ञानदेव पाचवी ते सातवी पर्यंत शिकलेले होते. त्यांच्या घरामध्ये देव देवतांचे फोटो आणि पुस्तके होती. पुस्तकांची ही थप्पी पाहून अण्णा भाऊ थकित झाले.त्यांची तीक्ष्म नजर फोटो व पुस्तके यावर बसली होती. आणि मलाही जमेल का? म्हणून विचारले. आपले बंधू ज्ञानदेव यांच्याकडून अण्णाभाऊ विविध पुस्तकांचे वाचन करून घेत ऐकत. असे एक वर्ष फक्त ऐकले. ऐकून ऐकून आण्णांनी पुस्तके तोंड पाठ केली ज्ञानदेवाच्या संगतीमध्ये अक्षर ओळख झाली ते वाचू लागले एक वर्ष त्यांनी कोणतेही काम केले नाही. वाटेगाव मध्ये ब्राह्मण शिक्षकाने मारल्यामुळे अण्णा भाऊंची शाळा सुटली परंतु मुंबईमध्ये त्यांच्या चुलत भावाकडून त्यांनी वाचनाची आणि लिहिण्याची कला हस्तगत केली.

अण्णाभाऊ साठे यांच्या २६ कथासंग्रहातून सुमारे १३० कथा प्रकाशित झाल्या. संपूर्ण कथा लेखनातून अण्णाभाऊंच्या बंडखोर मनाने घेतलेली अनुकृतीच अनुभव व्यक्त झाले. समाजातील शोषण ,अन्याय, अत्याचार दारिद्र्य ,विषमता ,लाचारी बलात्कार ,अंधश्रद्धा, जातीयता पाहून अण्णाभाऊ अस्वस्थ होते आणि त्यांचे मन पेटून उठत होते . आर्थिक विषमते सोबतच सामाजिक विषमतेचे चित्रणही अण्णाभाऊंच्या कथा मधून पुढे येते. अण्णाभाऊंच्या साहित्यात कल्पनेला वाव नव्हता. प्रत्यक्ष जीवनामध्ये अण्णांनी सोसलं ,अनुभवलं प्रत्यक्ष पाहिलं तेच आपल्या लेखणीतून उभं केलं. अण्णांनी आपल्या लिखानात संयुक्त महाराष्ट्र चळवळ मुंबई महाराष्ट्र ला मिळाली पण बेळगाव हे कर्नाटक मध्ये विलीन करण्यात आले. तेव्हा अण्णाभाऊंनी कवन रचून आपले महाराष्ट्र प्रेम व्यक्त केले. 'माझी मैना गावावर राहिली ,! माझ्या जीवाची होती या काहीली'!!. अण्णाभाऊ स्वतःच मोठे आहेत त्यांना कोणी मोठे करत नाहीत किंवा अण्णाभाऊ महान आहेत यासाठी कोणाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

ज्यावेळी त्यांचे वय २८ होते तेव्हाच १९४८ ला पॅरिस येथे भरणाऱ्या जागतिक साहित्य परिषदेचे निमंत्रण अण्णाभाऊंना मिळाले होते. १९६१ मध्ये विंडोसोवियत कल्चर सोसायटीने अण्णाभाऊंना रशियाला



बोलविले. दीड दिवस शाळेत जाऊन अफाट असे साहित्य निर्माण केले. वीस कथासंग्रह यामध्ये जवळपास ३०० कथा आहेत. ४० कादंबऱ्या पोवाडे , नाटक , लोकनाट्य लावण्या, प्रवासवर्णन, शाहिरी . सात कादंबऱ्यावर चित्रपट असा लिखाणाचा थक्क करणारा प्रवास आहे.



प्रा.शशिकांत जावळे
९४२३४७३२०४

त्यांच्या बऱ्याच कथा या आंबेडकरवादी आहेत. त्यापैकी एक असणारी 'बुद्धांची शपथ' या कथेमध्ये जातीव्यवस्था आणि प्रस्थापितांच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले होते त्या धर्मांतराचा प्रभाव गाव खेड्यातील महार जातीवर पडला होता. बौद्ध धर्माने झालेला सकारात्मक बदल सूक्ष्म निरीक्षणाद्वारे अण्णाभाऊ म्हणतात , जग बदल घालूनी गाव सांगून गेले मला भीमराव !
गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला का ऐरावत।
अंग झाडून निघ बाहेर घे बिनी वरती घाव।। सांगून गेले मला भीमराव ।।

बुद्धाची शपथ ही कथा लिहून अण्णाभाऊंनी एक प्रकारे 'स्वयंप्रकाशित व्हा' हा मार्ग दाखवला.

भारतातील जातीव्यवस्था नष्ट करण्याचे दृष्टीने कम्युनिस्ट विचारधारा अपुरी आहे याची जाणीव अण्णाभाऊंना झालेली होती. त्यामुळे उत्तर आयुष्यात अण्णाभाऊ आंबेडकरमय अर्थात आंबेडकरवादी झाले होते. अण्णाभाऊ साठे हे पहिले आंबेडकरी कथा लेखक आहेत याची नोंद मराठी वाङ्ममय इतिहासाने न घेणे हा त्यांच्यावरील फार मोठा अन्याय ठरेल . अण्णाभाऊ साठे यांची बहुतांशी साहित्य फुले -शाहू - आंबेडकर यांच्या विचारसरणीला पुढे घेऊन जाणारे आहेत. अण्णाभाऊ साठे यांची 'फकीरा' कादंबरी डॉ. बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण करून अण्णाभाऊ साठे यांनी संघर्ष करा ,लढा द्या हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मार्ग दाखवतात .

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की, मी हा रथ फार मोठ्या कष्टाने व श्रमाने ओढत आणला आहे. त्याला पुढे नेता येत नसेल तर जागीच राहू द्या. परंतु कदापिही मागे जाता कामा नये. याचा मतीत्तार्थ म्हणजे आपल्याला जे ७ अधिकार व हक्क मिळवून दिले आहेत ते भलेही वाढविता येत नसतील तरी चालेल. परंतु ते कमी होता कामा नये.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत एकूण ७० अधिकार व हक्क याची मागणी एससी व एसटी समूहासाठी केली होती. परंतु त्यापैकी फक्त सात अधिकार व हक्क संविधानात मिळाले आहेत. बाकी ६३ अधिकार व हक्क आपल्याला मिळणे बाकी आहे. त्यासाठी अनुसूचित जाती व जमाती मधील संघटना, पक्ष, नेते यांनी चळवळ उभी करणे आवश्यक आहे. उत्पादन करणाऱ्या व सेवा देणाऱ्या सरकारी संस्था, कंपन्या यांचे खाजगीकरणाचे धोरण सरकारने अवलंबिले आहे. जसे की बीएसएनएल, एम एस ई बी, रेल्वे, विमान इत्यादी प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात आरक्षण मिळवून देणारे क्षेत्र आपल्याला सांगता येतील. या सर्वांचे खाजगीकरण करून सरकारने आरक्षण संपविल्यात जमा आहे. त्यासाठी आपल्याला राष्ट्रीय स्तरावर आंदोलन उभे करणे गरजेचे आहे

आरक्षण वाचविले तरच आपल्याला प्रतिनिधित्व करता येईल. हिंदुत्ववाद्यांच्या विचारांच्या आमिषाला बळी पडून अनुसूचित जातीतील काही संघटना, पक्ष त्यांच्या वरचणीला जाऊन बसले आहेत. त्यामुळे समाज गोंधळलेल्या अवस्थेत आहे. येथील व्यवस्थेने आरक्षण संपवण्यासाठी अनुसूचित जातीत उपवर्गीकरण अ ब क ड याचे मृगजळ दिले आहे. त्याचे समर्थन काही नेते करीत आहेत. आंबेडकरवादी विचाराची मोट एकत्र केली तर समाजाला दिशा मिळू शकते. समाजाने लक्षात घेतली पाहिजे की शिक्षण महत्त्वाचे आहे व शिक्षणासाठी पैसा आवश्यक आहे मात्र अंधश्रद्धा, यात्रा , नवस ,कंदुरी अशा खर्चिक परंपरा व प्रथेला मातंग समाज काही बांधव आज देखील चिटकून आहे. तो खर्च त्यांनी टाळावा. गॅट करारामुळे जागतिक बाजारपेठ खुली झाली आहे. त्यामुळे देशातील निर्यात त्या प्रमाणात फार कमी आहे. ज्या प्रमाणात आयात सुरू आहे. स्थानिक उद्योगधंदे व रोजगार कमी झाला आहे त्यामुळे आजचा आपला तरुण वैफल्यग्रस्त झाला आहे .त्याला दिशा देण्याचे काम आंबेडकरवादी म्हणून आपण करणे आवश्यक आहे. नव्हे ती आपली जबाबदारीच आहे. आपण सर्वांनी मिळून हि जबाबदारी स्वीकारणे म्हणजेच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना खरे विनम्र अभिवादन ठरेल.साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

# राजकारणातील लोकाभिमुख नेतृत्व आदित्य (दादा) पाटील

सध्या राज्याच्या राजकारणाचे अधःपतन सुरू आहे.जनतेला आश्वासक वाटावेत असे चेहरे आता दिसेनासे झाले आहेत. या पक्षातून त्या पक्षात उड्या मारणाऱ्या पूढार्यांची संख्या वाढत आहे अशातच काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस पदी आदित्य पाटील यांची निवड होणे हे येणाऱ्या कालावधीसाठी आश्वासीत करते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश समितीच्या सरचिटणीसपदी आदित्य अशोकराव पाटील यांची नुकतीच निवड झाली.यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही निवड केवळ एक पद नाही, तर पक्षाने नव्या नेतृत्वावर दाखवलेला विश्वास आहे. माजी मंत्री अशोकराव पाटील व खा रजनीताई पाटील यांचा राजकिय वारसा लाभलेला आहे. केवळ वारसा मिळाला म्हणून नाही तर एक अभ्यासू राजकिय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. गांधीवादी विचार घेऊन अत्यंत संयमाने राजकारणाबरोबर समाजकारण करणारे असा त्यांचा लौकिक आहे. नगराध्यक्ष पदावर काम करताना विकासात्मक दृष्टिकोन ठेवून यशस्वीरित्या कार्य करत आहेत. पाटील हे त्यांच्या अभ्यासपूर्ण, कार्यतत्पर आणि जनतेशी थेट संवाद साधणाऱ्या नेतृत्वासाठी ज्ञात आहेत. त्यांनी युवक काँग्रेसमध्ये अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहे. कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा नेता म्हणून त्यांची छाप आहे. त्यांनी केवळ भाषणांमध्ये नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून जनतेचा विश्वास संपादन केला आहे.त्यांच्यावर नव्या जबाबदारीसह नवा विश्वास टाकण्यात आला आहे. सामाजिक चळवळीचा धागा पकडून राजकीय गणिताची गुंफण करून जनकेंद्रीत राजकारण पाटील करतात. केज विधानसभा मतदारसंघात मागील अनेक वर्षांपासून दुष्काळ असो की अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान यावेळी शेतकऱ्यांना बांधावर जाऊन भेटून नुकसान भरपाई साठी प्रयत्न करणारे आदित्य पाटील लोकांना आपला माणूस वाटतात. सरचिटणीसपदाच्या माध्यमातून त्यांच्यावर आता पक्ष संघटन मजबूत करण्याची, तालुका व जिल्हास्तरावर युवा नेतृत्व घडवण्याची आणि आगामी निवडणुकांसाठी पक्षाचे विचार प्रभावीपणे लोकांपर्यंत



पोहोचवण्याची मोठी जबाबदारी आली आहे. पक्षाच्या धोरणांचा प्रचार, जनतेशी संवाद, जनतेत काँग्रेसचा प्रभाव वाढवणे या गोष्टींवर त्यांचा विशेष भर असतो. त्यामुळेच हा निर्णय पक्षाच्या युवा धोरणांना अधिक गती देणारा ठरणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील जनसंपर्क शांत संयमी, पण ठाम भूमिका असणारे आदित्य दादा पाटील त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतील कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला असून, ही निवड पक्षासाठी आशेचा किरण ठरणार असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. पक्षाच्या राज्यातील नवसंघटन प्रक्रियेला आदित्य पाटील यांच्या रुपाने तरुण नेतृत्वाची नवी दिशा लाभेल, आणि काँग्रेस पक्ष जनतेच्या मनामनात पुन्हा जागा निर्माण करेल, असा विश्वास वाटतो. बीड जिल्ह्यात जिल्ह्याचा राजकारणात गढूळ वातावरण निर्माण झाले होते.जाती जाती मध्ये मतभेद तयार झाले होते. यावेळी सामाजिक सलोख्यासाठी काँग्रेस ने सद्भावना पदयात्रा काढून यामधून सामाजिक सलोखा जोडण्यासाठी ही पदयात्रा महत्वाची ठरली.यामध्ये विविध सामाजिक संघटना,सामाजिक कार्यकर्ते,सर्व जाती धर्मातील नागरिक सहभागी झाले होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश समितीच्या सरचिटणीस पदावर आदित्य पाटील यांची नुकतीच नियुक्ती झाली. ही निवड पक्षाच्या भविष्यासाठी एक सकारात्मक पाऊल असून तरुण नेतृत्वाला संधी देण्याच्या काँग्रेस पक्षाच्या धोरणाची ही ठळक निशाणी आहे.आदित्य पाटील यांची राजकीय कारकीर्द अशी या आहे अत्यंत अभ्यासू, दूरदृष्टी असलेले आणि समाजाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जातात. स्थानिक स्तरावरून सुरू झालेला हा प्रवास आता राज्यस्तरावर पोहोचलेला आहे. त्यांच्या नेतृत्वात युवक काँग्रेस, आणि जिल्हा कार्यकारिणीमध्ये विशेष कामगिरी केली आहे. ग्रामीण भागातील समस्या, शेतकऱ्यांचे हक्क, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या मुद्द्यांवर त्यांचा ठाम आणि स्पष्टवक्ता दृष्टिकोन पक्षासाठी नेहमीच महत्वाचा ठरलेला आहे. काँग्रेस पक्षाची विश्वासू निवड महाराष्ट्रातील राजकारणात सध्या अस्थिरतेचे वारे आहेत. अशा परिस्थितीत आदित्य पाटील यांच्यासारख्या तरुण, ऊर्जावान आणि ध्येयवेड्या नेत्याला सरचिटणीसपदाची जबाबदारी देणे ही पक्षाच्या नवविचारांची आणि नवसंजीवनीची साक्ष आहे. पाटील भविष्यासाठी दिशा ठरवून कार्य करण्याची संधी आहे.सरचिटणीस या पदावर काम करताना पक्ष संघटन बळकट करणे, युवकांना जोडणे, आगामी काळातील निवडणुकांसाठी रणनीती आखणे या मुख्य जबाबदाऱ्या आदित्य पाटील यांच्या खांद्यावर असतील. त्यांचा अनुभव, विचारशैली आणि लोकांशी असलेला थेट संवाद निश्चितच काँग्रेस पक्षाच्या पुनरुज्जीवनासाठी उपयुक्त ठरेल. निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन !पुढील कार्यास शुभेच्छा!

**शब्दांकन :एक निष्ठावंत काँगेस कार्यकर्ता**

# इनरव्हील क्लबने सामाजिक कार्यातून आदर्श निर्माण केला-तहसीलदार विलास तरंगे

## वेदना कळणारेच समाज उद्धाराचे काम करतात-डॉ.राजेश इंगोले

### इनरव्हील क्लबचा पुढाकार ; अंबाजोगाई तहसील कार्यालयात हिरकणी कक्षाची स्थापना

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील तहसील कार्यालयामध्ये इनरव्हील क्लब अंबाजोगाई शाखेच्या वतीने नुकतेच हिरकणी कक्षाची स्थापना केली. या हिरकणी कक्षाचे उद्घाटन अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे तसेच इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते संपन्न झाले.या सामाजिक उपक्रमाला प्रशासकीय व सामाजिक स्तरावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला. यावेळी निवासी नायब तहसीलदार सचिन देशपांडे, नायब तहसीलदार स्मिता बाहेती, नायब तहसीलदार मिलिंद गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी तहसीलदार विलास तरंगे यांनी हिरकणी कक्षाच्या संकल्पनेचे व इनरव्हील क्लबच्या कार्याचे कौतुक करीत इनरव्हील क्लबने समाज उपयोगी काम करेल एक सामाजिक आदर्श निर्माण केला आहे व त्यांच्या इतर सामाजिक उपक्रमांनाही आम्ही सकारात्मक प्रतिसाद देऊन असे आश्वासन दिले. उद्घाटन प्रसंगी बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी हिरकणी कक्ष ही प्रत्येक कार्यालयामधील अत्यावश्यक असलेली गोष्ट आहे. कारण, ही सुविधा नसेल तर माता आपल्या आपल्या मुलांना दूध पाजण्यासाठी लाजतात. त्यामुळे दिवसभर येथे कार्यालयीन कामास आलेल्या महिलांकरिता ही उपयोगी व्यवस्था झाली आहे. यामुळे कुपोषणाचा दर ही कमी होईल असे म्हणत इनरव्हील क्लब सामाजिक भान ठेवून, सजग राहून समाजाप्रती आपली जबाबदारी उचलत आहे त्या सर्व कार्याला माझा व इंडियन मेडिकल असोसिएशनचा भविष्यातही संपूर्ण पाठिंबा राहील असे आश्वासन दिले. नायब तहसीलदार स्मिता बाहेती यांनी हिरकणी कक्षाची स्थापना करून इनरव्हील क्लबने शेकडो मातांची स्तनपानाची व्यवस्था केलेली आहे. त्याचे आशिर्वाद इनरव्हील क्लबला नक्की लागतील असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सुरेखा शिरसाट यांनी केले. या कार्यक्रमासाठी इनरव्हील क्लबच्या चंद्रकला देशमुख, अंजली चरखा, सुरेखा कचरे, वर्षा देशमुख, वर्षा ठाकरे यांच्यासह इतर सदस्यांनी परिश्रम घेतले.




## जमीन खरेदी-विक्री प्रकरणात फसवणूक झालेल्या नागरिकांनी त्वरित संपर्क साधावा-डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जमीन किंवा प्लॉट खरेदी विक्री प्रकरणात फसवणूक झालेल्या नागरिकांनी त्वरित योग्य त्या कागदपत्र व पुराव्यांसकट माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहन डॉ.राजेश इंगोले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.अंबाजोगाई व परिसरात गेल्या काही वर्षांमध्ये जमिनीच्या प्लॉटच्या मागणीमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे तसेच जमिनीच्या प्लॉटच्या किमती प्रचंड प्रमाणात वाढलेले आहेत.सर्वसामान्य जनतेच्या मनात आपलं एक हक्काचं घर असावं, ते स्वस्तात मिळाव या मानसिकतेचा फायदा घेऊन काही बोगस दलालांनी, सर्वसामान्य माणसाच्या या मानसिकतेचा फायदा घेऊन अत्यल्प दरामध्ये जमिनी प्लॉट तुम्हाला खरेदी देतो करून देतो असे सांगून अनेक सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक केलेली आहे. यामध्ये एकाच प्लॉटची अनेक जणांना विक्री केली आहे. काही ठिकाणी प्लॉट मालकांनीच एजंट लोकांना हाताशी धरून त्यांच्या नांवे वेगवेगळ्या एजंट मार्फत त्यांच्या प्लॉटच्या अनेक जणांकडून इसार घेतलेला आहे व लोकांची फसवणूक केलेली आहे. रजिस्ट्री ऑफिसमध्ये ही एकाच प्लॉटच्या दोन - दोन रजिस्ट्री झालेले आहेत तसे पुरावे माझ्याकडे आलेले आहेत हे सर्व पुरावे घेऊन लवकरच आता बीड चेक कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांना भेटणार असल्याचे डॉ.इंगोले यांनी यावेळी जाहीर केले. बीड पोलीस कार्यालयातर्फे अंबाजोगाई उपविभाग येथे जनसंवाद बैठक घेण्यात आली होती. त्यामध्ये अंबाजोगाईचे माजी शिक्षण सभापती तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजेश इंगोले यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेबांना अंबाजोगाई मध्ये जमीन व प्लॉट विक्री खरेदी संदर्भात अनेक बोगस रजिस्ट्री होत आहेत. एकाच प्लॉटची अनेक जणांना विक्री करून फसवणूक होत आहे. यामध्ये अनेक टोळ्यांचे लोक एकत्र येऊन सर्वसामान्य लोकांना फसवत आहेत. अनेक खोटे पुरावे, ग्रामपंचायतीचे दाखले, सही, शिक्के, बोगस आधारकार्ड तयार करून जमिनीचे खरेदी विक्री बिनदिक्कत करीत आहेत. त्या संबंधीचे पुरावे कागदपत्रे आपल्याकडे असल्याचे पोलीस अधीक्षक कांवत साहेबांना सांगितले होते. त्यावेळी पोलीस अधीक्षकांनी आपल्या भाषणामध्ये या मुद्द्याचा आवर्जून उल्लेख करीत डॉ.इंगोले यांनी नमूद केलेली माहिती ही गंभीर स्वरूपाची आहे, अशी बोगस कागदपत्रे, ओळखपत्रे तयार करणे हे गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत असे सांगत डॉ.इंगोले यांना तुम्ही सर्व पुरावे घेऊन बीड येथे या आरोपींवर कडक व कायदेशीर कार्यवाही आपण करू असे आश्वासन या जनसंवाद मेळाव्यामध्ये दिले होते. संदर्भीय अनुषंगाने डॉ.इंगोले यांनी अशा बोगस जमीन खरेदी - विक्री प्रकरणात अनेक दस्ताऐवज व पुरावे गोळा केलेले आहेत ते दस्तऐवज घेऊन लवकरच बीडच्या पोलीस अधीक्षकांना भेटणार असल्याचे डॉ.इंगोले यांनी जाहीर केलेले आहे. अंबाजोगाई मध्ये अशा फसवणूक झालेल्या सर्वसामान्य जनतेने न घाबरता समोर येऊन आपली झालेली फसवणूक , कैफियत मांडावी व फसवणुकीचे पुरावे आपल्याकडे द्यावेत, जनतेची बाजू पोलीस अधीक्षकांकडे मांडून फसवणूक झालेल्या सर्वसामान्य जनतेचे न्याय देण्याचा प्रयत्न आपण करणार असल्याचे डॉ.इंगोले यांनी यावेळी सांगितले आहे. तरी अशा खरेदी विक्री प्रकरणात फसवणूक झालेल्या लोकांनी पुरावे घेऊन येणाऱ्या त्वरित समाधान रूग्णालय, हाऊसिंग सोसायटी पंचायत समिती जवळ येऊन डॉ.इंगोले यांना भेटावे तसेच संपर्कासाठी (९४२२२४०७१०) या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन ही डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले.



## साई पारायण सेवा आणि श्रद्धेचा संगम: डॉ. सुजय विखे पाटील




**शिर्डी (प्रतिनिधी)**

शिर्डी येथे सुरू असलेल्या साई सच्चरित पारायण सोहळ्याला डॉ. सुजय विखे पाटील यांनी भेट दिली. १००० रूमजवळ भक्तिमय वातावरणात पारायणाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या पवित्र सोहळ्यात त्यांनी साई महाराजांचे प्रवचन करणाऱ्या पूज्य महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले.या पारायण सोहळ्याचे आयोजन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, नाट्य रसिक मंच शिर्डी व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले असून, ही सामूहिक सेवा आणि श्रद्धेची एक सुंदर अभिव्यक्ती आहे, असे मत डॉ. विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त. डॉ. विखे पाटील यांनी भाविक भक्तांसमवेत भारतीय बैठक लावून प्रसाद ग्रहण करताना, या क्षणाला सेवा आणि श्रद्धेचा संगम असे सांगितले. यावेळी विखे पाटील परिवाराच्या वतीने पारायण सोहळ्यासाठी एक लाख रुपयांची देणगी आयोजक समितीकडे सुपूर्त करण्यात आली.यावेळी डॉ. विखे पाटील यांनी ऑक्टोबर महिन्यात शिर्डीत होणाऱ्या प्रदीप मिश्रा महाराज यांच्या आगामी कार्यक्रमाची रूपरेषा लवकरच जाहीर होईल, अशी माहिती देखील दिली. तसेच त्यांनी आग्रहाने आवाहन केले की, या पावन कार्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या स्वयंसेवकांनी आमच्याशी संपर्क साधावा.या पवित्र पारायण सोहळ्यात हजारो भाविकांनी भक्तिभावाने सहभाग दर्शविल्याने परिसर अतिशय भक्तिमय, ऊर्जा आणि एकात्मतेने भारलेला दिसत होता. श्री साई बाबांच्या चरणी मन मोकळं करणाऱ्या या सोहळ्याने प्रत्येकाच्या हृदयात अनमोल स्मृती आणि नवचैतन्य पसरवले. यावेळी अभय शेळके पाटील, भाजपा अध्यक्ष रवींद्र गोंदकर, ताराचंद कोते तसेच शिर्डी ग्रामस्थ आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाण्यात कनोजिया युवाशक्ती फाउंडेशनचा लॉन्ड्री व्यावसायिक दरपत्रक प्रकाशन




**ठाणे । प्रतिनिधी**

कनोजिया युवाशक्ती फाउंडेशन (KYSF) आयोजित लॉन्ड्री व्यवसाय दरपत्रक प्रकाशन समारोह ठाणे कोट नाका येथील टाऊन हॉलमध्ये पार पडला. या कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी म्हणून संतोष कडू - अध्यक्ष, सुशील कारखानीस (संरक्षक), महेंद्र जाधव (संरक्षक), दत्ता घाडगे (प्रमुख सल्लागार), अजय पासी (प्रमुख सल्लागार) आणि महेंद्र कनोजिया यांच्या ठाणे जिल्हाध्यक्षांची उपस्थिती लाभली.या कार्यक्रमामध्ये लॉन्ड्री व्यवसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व लॉन्ड्री चालक-मालक-कामगारांना रेटकार्ड वितरित करण्यात आले. दत्ता घाडगे म्हणाले, धोबी व्यवसाय हा एक पारंपरिक व्यवसाय आहे आणि या समाजाची भूमिका एक समाजसेवक म्हणून आहे.जर या व्यवसायातील सर्व लोक एकत्र येतील तर समाजाची सामाजिक, आर्थिक प्रगती नक्कीच होईल. हा एक महत्त्वपूर्ण संदेश आहे जो धोबी समाजाला एकजुट होण्यासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी काम करण्यासाठी प्रेरित करतो. सर्व लॉन्ड्री व्यावसायिकांना आपल्या अधिकाराची जाणीव सुद्धा या कार्यक्रमातून करून दिली गेली. एकूणच या कार्यक्रमात परीट समाजाची भूमिका आणि त्या समाजाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला गेला.


## बार्शी नका बायपासवर उदरनिर्वाहासाठी चंदा मागणारी तृतीयपंथी रोशनीला बेधुंद वाहन चालकाने उडवले

**पायाचे तुकडे झाले,वाहन चालक पळून गेला,जिल्हा रुग्णालयात साधं तपासले ही नाही, तृतीय पंथीय संतप्त**

**बीड । प्रतिनिधी**

३० जुलै २०२५ रोजी सकाळी वाहन चालकांकडून चंदामागत त्यांना आशीर्वाद देत उभी असलेली तृतीयपंथी रोशनी हिला भरधाव वेगात आलेल्या मिनीबसने जोरदार धडक दिली. अपघातानंतर वाहन चालकाने माणुसकी वेशीला टांगून वाहनासह पळून गेला. भर रस्त्यावर रोशनी अर्धा तास तडफडत होती. तिला कसे बसे जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तर त्या ठिकाणी तब्बल दीड तास साधं तपासले सुद्धा नाही. जिल्हा रुग्णालयातील रुग्णांचे होत असलेले बेहाल, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अक्षम्य दुर्लक्ष यावर संतप्त झालेल्या तृतीयपंथीयांनी जिल्हा रुग्णालयात राडा घातला. यानंतर जखमी रोशनी हिला खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.तिच्या पायाच्या हाडाचे ४ ते ६ ठिकाणी तुकडे झाले असून हाताला सुद्धा गंभीर इजा झाली आहे.तिची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.

बीड सोलापूर बार्शीनाका बायपास वर सकाळी ११ वाजता तृतीयपंथी रोशनी सपना धुताडमल (वय अंदाजे २५) ही रस्त्याच्या कडेला आपल्या सहकारी तृतीयपंथी सोबत उभ्या होत्या, तेव्हा अचानक भरधाव वेगात आलेल्या एका मिनी बसने त्यांना जोरदार धडक दिली. अपघाता नंतर मिनीबस चालक गाडीसह पळून गेला. रोशनीने धडक दिल्यानंतर बाजूला झोकून दिले अन्यथा ती गाडीच्या चाकाखालीच चिरडली गेली असती. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या



अवस्थेत ती अर्धातास रस्त्यावर पडून होती. येणाऱ्या जाणाऱ्या काही वाहन चालक,नागरिकांनी पुढाकार घेत त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु जिल्हा रुग्णालयामध्ये तब्बल दीड तास गंभीर जखमी अवस्थेतील रोशनीवर कसलेही उपचार केले गेले नाहीत.तिला उचलून रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी वार्ड बॉय सुद्धा स्ट्रेचर घेऊन आले नाहीत. त्यामुळे जिल्हा रुग्णालयात जमा झालेल्या तृतीय पंथीयांनी संतप्त होऊन राडा घातला. बीड जिल्हा रुग्णालयामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक यांचा वचक राहिलेला नाही. त्यामुळे आरोग्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. त्यानंतर जमा झालेल्या तृतीय पंथियांनी तिला खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. तिच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

## जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर आयोजित रेड रन स्पर्धा २०२५ ला युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय युवक दिनाच्या पूर्वसंध्येला, दिनांक २८ जुलै २०२५ रोजी जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे रेड रिबीन क्लब सदस्यांसाठी रेड रन मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. श्रीकांत पाठक, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, प्रशासकीय अधिकारी डॉ. साहेबराव डावरे, रोटरी क्लब अध्यक्ष डॉ. विनोद मोरे, उद्योजक राजमोती साबुदाणा दिनेश शिंगवी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव व वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम पानसंबळ यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

जिल्हा रुग्णालयातून सुरू झालेली ही मॅरेथॉन २.५ किलोमीटर अंतर पार करून त्याच मार्गे परत जिल्हा रुग्णालयात समारोप करण्यात आली.




पारितोषिक वितरण प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आज प्रत्येकाने आपल्या शरीराच्या स्वास्थ्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. खेळांच्या माध्यमातून आपण आपले शरीर सुदृढ ठेवू शकतो, म्हणूनच मैदानी खेळात सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.असे सांगून त्यांनी विजेते आणि सहभागी सर्वांचे अभिनंदन केले.

महिला गटात पूजा चांगदेव धनगर (न्यू आर्ट्स महाविद्यालय) हिने प्रथम, राजनंदिनी विलास पुंडे (न्यू लॉ कॉलेज) हिने द्वितीय तर प्रीती अशोक पठारे (निवास महाविद्यालय) हिने तृतीय क्रमांक पटकावला. पुरुष गटात विजय दशरथ फुलमाळी (बाणेश्वर महाविद्यालय, बुहानगर) याने प्रथम, सार्थक उमेश आजबे (पेमराज सारडा महाविद्यालय) याने द्वितीय तर परशुराम सदाशिव इथापे (न्यू आर्ट्स महाविद्यालय) याने तृतीय क्रमांक मिळवला. स्पर्धेनंतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकानुसार पदके, प्रमाणपत्रे आणि रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १२ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय युवक दिनाच्या निमित्ताने एचआयव्ही-एड्सविषयी जनजागृतीसाठी विविध गटांमध्ये वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. जिल्ह्यातील ५१ महाविद्यालयांमध्ये रेड रिबीन क्लब स्थापन करण्यात आले असून या क्लबच्या सदस्यांमध्ये एचआयव्ही-एड्सबाबत जनजागृती व्हावी आणि त्यांच्या माध्यमातून महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांपर्यंतही ही जनजागृती पोहोचावी हा रेड रिबीन क्लबचा प्रमुख उद्देश आहे.

## गणेश गायकवाड यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील आनंदगाव येथील रहिवाशी गणेश संभाजी गायकवाड वय ५८ वर्ष यांचे हृदयविकाराचा तीव्र धक्क्याने बुधवार सायंकाळी हैद्राबाद येथे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आनंदगाव येथील शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,चार भाऊ,जावई असा मोठा परिवार आहे.बप्पा म्हणून ते सर्वपरिचित होते.ते माजी सरपंच ज्ञानेश्वर गायकवाड,बाबासाहेब गायकवाड यांचे बंधू होत त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरावर शोककळा पसरली आहे.

# आदित्य (दादा) पाटील यांची राजकीय गगनभरारी

## काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी निवड



**केज । प्रतिनिधी**

काँग्रेसचे युवा नेते तथा केज नगरपरिषचे माजी नगराध्यक्ष आदित्य अशोकराव पाटील यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस पदी निवड करण्यात आली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये त्यांना मानाचे स्थान मिळाले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे युवा नेते आदित्य पाटील मागच्या अनेक वर्षांपासून काँग्रेसचे सक्रिय पदस्थ तथा संघटनात्मक काम करत आहेत.नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भूषवले , उपनगराध्यक्ष पदावर दमदार काम केले. विद्यमान नगरसेवक पदावर काम करताना नगरपंचायत च्या माध्यमातून केज शहराच्या विकासात गती देण्यासाठी आदित्य पाटील यांनी योगदान दिले. आहे. त्यांचा बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी सक्रियपणे सहभाग आहे . सदभावना पदयात्रेने सामाजिक सलोखा जपला बीड जिल्ह्यातील सामाजिक घडी विस्कटली होती.त्यावेळी आदित्य पाटील यांनी काँग्रेस माध्यमातून सदभावना मसाजोग ते बीड पदयात्रा काढली. या पदयात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ स्वतः पदयात्रेत पायी चालले.

**पदयात्रेत राज्यभरातून**

हजारो पदयात्री सहभागी झाले होते. सामाजिक क्षेत्रातील नागरिकांनी मोठा सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्रामध्ये यानंतर विविध ठिकाणी पदयात्रा काढण्यात आल्या. पदयात्रेच्या माध्यमातून दुभंगलेली मने जोडण्याचा दोन समाजातील तेढ दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. न्यायासाठी सरकारला धारेवर धरण्यात आले होते. काँग्रेसने काढलेल्या पदयात्रेचे राज्यभर कौतुक झाले होते .माजी मंत्री अशोकराव पाटील व खा रजनीताई पाटील यांचा राजकिय वारसा लाभलेला आहे. केवळ वारसा मिळाला म्हणून नाही तर एक अभ्यासू राजकिय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. गांधीवादी विचार घेऊन अत्यंत संयमाने राजकारणाबरोबर समाजकारण करणारे असा त्यांचा लौकिक आहे. नगराध्यक्ष पदावर काम करताना विकासात्मक दृष्टिकोन ठेवून यशस्वीरित्या कार्य केले आहे.

**युवकांचे आयकॉन**

युवक काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष पदावर काम करताना जिल्हाभरातील युवकांना सोबत घेऊन युवक काँग्रेसचे संघटन उभा केले. कार्य निष्ठेमुळे निष्ठावान कार्यकर्ता ते युवकांचा आयकॉन बनले आहेत.

**सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन काम करणारे युवा नेतृत्व म्हणून ओळख आहे.**

जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्पर असतात. त्यांनी कधीही अडवाआडवीचे राजकारण केलेले नाही. बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक चळवळीतही आदित्य पाटील अग्रेसर राहिलेले आहेत काँग्रेस पक्ष बांधणी यामध्ये पाटील यांचे मोठे योगदान आहे या कार्याची दखल घेऊन त्यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली आहे खासदार रजनीताई पाटील आणि माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी युवक काँग्रेसमध्ये असताना मोठ्या प्रमाणावर पक्षाची संघटनात्मक बांधणी केलेली आहे. सदर कार्याची दखल घेऊन काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस पदावर निवड करण्यात आली. यापुढील काळामध्ये काँग्रेस पक्षवाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आले बीड जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, नूतन प्रदेश चिटणीस गणेश राऊत, उप नगराध्यक्ष पशुपतिनाथ दांगट, नवनाथ थोटे, रमेश पाटील, प्रवीणकुमार शेप यांच्यासह अनेक मान्यवरांनी, पदाधिकारी, व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# महसूल सप्ताह दिन एक ते सात ऑगस्ट या कालावधी मध्ये साजरा होणार–उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगाव येथील तहसील कार्यालयात महसूल सप्ताह दिना निमित्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीस उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे. व नायगावच्या तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड. बिलोली चे तहसीलदार गजानन शिंदे. हे उपस्थित होते.नायगाव तालुक्यातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या विविध सेवा आणि विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजना बाबत उपविभागातील नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरूकता वाढावी शासनाबद्दल व शासनाच्या काम काजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्ध व्हावा या उद्देशाने महसूल विभागामार्फत दिनांक ०१ ऑगस्ट रोजी महसूल दिन दिनांक ०१ ऑगस्ट ते ०७ ऑगस्ट २०२५ या कालावधी मध्ये महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांनी दिली आहे.सदरील सप्ताहामध्ये घ्यावयाच्या कार्यक्रमाचा तपशील पुढील




प्रमाणे आहे. दिनांक ०१ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताहाचा शुभारंभ करणे महसूल दिनाच्या दिवशी महसूल विभागातील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांचा संवाद कार्यक्रम उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी यांची मनोबल उंचावण्यासाठी पुरस्कार वितरण आणि विविध लाभांपासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांना विविध मान्यवरांच्या हस्ते लाभ प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयत्न अर्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांना अतिक्रमण नियमाना फुल करून सदर अतिक्रमीत जागांचे पट्टेवाटप करण्या बाबतचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. तसेच ०३ ऑगस्ट २०२५ रोजी पांदन शिव रस्त्याचे मोजणी करून त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्याचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत प्रत्येक मंडळ स्थळावर एक लाभ वाटपाचा शिबीर घेण्यात येणार आहे. सदर शिबिरामध्ये सर्व विभागांचा सहभाग त्या ठिकाणी नोंदवण्यात येणार आहे. ५ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष सहाय्य योजनेतील डिबिटी न झालेल्या लाभार्थ्यांना घर भेटी करून डीबीटी करून अनुदानाचे वाटप करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. दिनांक ६ ऑगस्ट शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कर्षित करणे व त्या अतिक्रमण मुक्त करणे तसेच शब्दभंग झालेल्या जमिनी बाबत शासनाच्या धोरणानुसार निर्णय घेण्याची कारवाई करण्यात येणार आहे. आणि दिनांक सात ऑगस्ट २०२५ रोजी एम्साईन धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानस कार्य प्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे. सदर ०१ ते ०७ ऑगस्ट २०२५ रोजीच्या महसूल सप्ताहामध्ये भूमी अभिलेख विभाग आणि मुद्रांक नोंदणी विभागाचा देखील सहभाग राहणार आहे. त्या त्या विभागाच्या विविध योजनाचा लाभ वाटप देखील करण्यात येणार आहे. तरी नायगाव तालुक्यातील नागरिकांनी सदर महोत्सव सप्ताह अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवून विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे.व नायगावच्या तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड यांनी केले आहे.

### किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी यांनी

# जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये पटकवला तिसरा क्रमांक

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था संचलित पुस येथील किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी समर्थ धोकटे यांनी बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकवल आहे. समर्थ धोकटे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि बीड जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धे मोठ्या उत्साहात घेण्यात आल्या. योगासन स्पर्धेत ग्रामीण, शहरी विद्यार्थी आणि युवकांचा सहभाग वाढावा, खेलो इंडिया, ऑलिम्पिक साठी खेळाडू तयार व्हावेत, तसेच सर्वत्र मानसिक व शारीरिक तंदुरुस्तीसाठी योगाचा प्रचार व्हावा यासाठी या स्पर्धा घेतल्या जातात. नुकत्याच पार पडलेल्या बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धे मध्ये कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था संचलित पुस येथील किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयाचा




विद्यार्थी समर्थ धोकटे यांनी बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकवल आहे. त्यांच्या यशाबद्दल कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था अध्यक्ष तथा नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे व किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वानी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# गणेशोत्सवानिमित्त दिवा रेल्वे स्थानकातून कोकणात जाण्यासाठी विशेष रेल्वे गाड्या सुटणार

### मनसेचे मा.आ.राजू पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**ठाणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते मा. आमदार राजू (प्रमोद) पाटील यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून गणेशोत्सव निमित्ताने कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी मध्य रेल्वेच्या वतीने दिवा रेल्वे स्थानकावरून विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत.

दिनांक २२ ऑगस्ट २०२५ ते १० सप्टेंबर २०२५ दरम्यान गाड्या सोडण्यात येणार आहे. १०६३ अप आणि १०६४ डाऊन अशा क्रमांकाच्या १९ जोडी (एकूण ३८ फेऱ्या) विशेष गाड्या असतील या गाड्यांसाठी IRCTC मोबाईल ॲप किंवा www.irctc.co.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन आरक्षण करता येईल. याशिवाय, दिव्याजवळील कल्याण, ठाणे आणि मुंब्रा येथील आरक्षण खिडकीवर प्रत्यक्ष तिकीट आरक्षणाची सुविधा देखील उपलब्ध करण्यात आलेली



आहे.दिवा वासीयांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि गणेशोत्सवासाठी कोकण प्रवास सुखकर करावा ही विनंती असे महाराष्ट्र नवनिर्माण सेना मा. आमदार राजू पाटील यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# सौंदाना येथे असर इंडिया प्रकल्पांतर्गत पेयजल समृद्ध गाव प्रशिक्षण व प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न–गायके राजू

**बीड । प्रतिनिधी**

सौंदाना ता.जि.बीड येथे असर इंडिया प्रकल्प अंतर्गत आणि रिसोर्स ॲन्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट बेलापूर,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वीस तासांचे पेयजल समृद्ध गाव प्रशिक्षण कार्यक्रम ३ जून २०२५ ते ७ जून २०२५ या कालावधीत यशस्वीरित्या पार पडला. या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींना दि. ३१ जुलै २०२५ रोजी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत कार्यालय सौंदना तालुका जिल्हा बीड येथील सरपंच सौ जनाबाई सूर्यभान गायकवाड, लघु पाटबंधारे विभाग क्रमांक तीन अंतर्गत असणारे कर्मचारी श्री चिंतामण महाराज मोरे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री गायके राजू ,ग्रामरोजगार सेवक श्री बाळासाहेब गायके व तंटामुक्ती अध्यक्ष श्री कहानू गिणाजी गायके हे उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ जनाबाई सूर्यभान गायकवाड व पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके



यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात सुरक्षित व स्वच्छ पेयजलाची गरज, पाण्याचे महत्त्व तसेच आर्थिक स्वावलंबन यावर सविस्तर प्रकाश टाकला आणि प्रशिक्षणार्थ्यांचे कौतुक केले.या प्रशिक्षणादरम्यान सहभागींचे स्वच्छ पेयजल व्यवस्थापन, जलस्रोतांचे संवर्धन व निगा, पाणी तपासणी प्रक्रिया, जलसंधारण तंत्र तसेच पाण्याशी संबंधित आजार व त्यावरील प्रतिबंध याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षक म्हणून जिल्हा समन्वयक पर्यावरण कारभारणी बीड चतुराबाई क्षीरसागर व पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके यांनी आपल्या भूमिका पार पाडल्या. ग्रामपंचायत कार्यालय सौंदाना येथील सरपंच सर्व पदाधिकारी पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके व सौंदाना येथील ग्रामस्थ यांनी प्रशिक्षण शिबिराचे उत्कृष्ट आयोजन केले.

प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके व तंटामुक्ती अध्यक्ष श्री कहानू गिनाजी गायके यांनी केले, तर आभारप्रदर्शन लघु पाटबंधारे बीड विभाग क्र–३ अंतर्गत असणारे कर्मचारी श्री चिंतामण रुस्तुम मोरे यांनी केले. एकूण २०/२१ प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण पूर्ण केले असून सर्वांना यशस्वी व सहभागासाठी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामस्तरावर सुरक्षित पाण्याबाबत जनजागृती निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. यावेळी जिल्हा समन्वयक पर्यावरण कारभारणी बीड चतुराबाई क्षीरसागर सौंदाना येथील पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके, तंटामुक्ती अध्यक्ष श्री कहाणू गिनाजी गायके, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बीड श्री गायके राजू माजी सरपंच श्री गोरख गायके ग्रामरोजगार सेवक श्री बाळासाहेब दिलीप गायके, श्री विलास विष्णू कथले अंगणवाडी कार्यकर्ते सुरेखा शरद गायके, सौ सविता नारायण काकडे सौ विद्या विलास कथले, श्री दिलीप श्रीरंग गायके श्री गोवर्धन कथले, श्री वैजनाथ चव्हाण आदि गावकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय स्पर्धेनिमित्त भारताच्या रग्बी संघाच्या सराव शिबिरासाठी बीडच्या ३ खेळाडूंची निवड

**बीड । प्रतिनिधी**

नेताजी सुभाषचंद्रबोस क्रीडा संकुल (ड–ख) कोलकत्ता,पश्चिम बंगाल येथे दिनांक १ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०२५ दरम्यान १८ वर्षाखालील गटाच्या भारतीय संघाची निवड चाचणी संपन्न होत आहे.या निवड चाचणीसाठी पूर्ण भारत देशातील सर्वोत्कृष्ट २७ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या खेळाडूंमध्ये मोरया क्रीडा मंडळ बीड तसेच बीड जिल्हा रग्बी असोसिएशनचे कीर्ती किरण जाधव व दिपाली दिलीप ताठे या दोन खेळाडूंची निवड सराव शिबिरासाठी करण्यात आली आहे. सदरील सराव शिबिर ४० दिवस चालणार आहे.सदरील स्पर्धेत निवड होणारे खेळाडू आशियाई चॅम्पियनशिप १८ वर्षाखालील गटासाठी होनोट, चायना येथे होणाऱ्या स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

तसेच २० वर्षा खालील मुले गटात सर्वोत्कृष्ट २४ खेळाडू सबंध भारतातून निवडण्यात आले आहेत.यात महाराष्ट्रातून फक्त बीडच्या यश बालासाहेब जाधव या खेळाडूचे निवड करण्यात आली आहे. २० वर्षाखालील गटाची आंतरराष्ट्रीय स्पर्धा यावर्षी भारतातील राजगीर,बिहार येथे संपन्न होणार आहे.सदरील सराव शिबिर नेताजी सुभाषचंद्रबोस क्रीडा संकुल (ड–ख) कोलकत्ता,पश्चिम बंगाल येथेच संपन्न हाते आहे. मागील वर्षी १८ वर्षाखालील गटात आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतीय संघात आपले स्थान निश्चित करून बीडच नव्हे तर मराठवाड्यातील रग्बी खेळातील प्रथम आंतरराष्ट्रीय खेळाडू होण्याचा मान यश जाधव या खेळाडूंनी मिळाला होता.



सर्व खेळाडूंना मोरया क्रीडा मंडळ बीडचे संस्थापक अध्यक्ष, राष्ट्रीय रग्बी प्रशिक्षक तसेच बीड जिल्हा रग्बी मुख्य प्रशिक्षक श्री नितीन येळवे सर (८२०८४४४८३६),रग्बी प्रशिक्षक तथा कारागृह पोलीस (बीड) शोएब खाटीक, तसेच अशोक चौरे सचिव मोरया क्रीडा मंडळ, यांनी अतिशय उत्तम प्रशिक्षित केलेले आहे.तसेच हा खेळ शासनाच्या नौकरी मधील ५% आरक्षणात असल्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळांनी आणि खेळाडूंनी यात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा संघटने कडून करण्यात येत आहे.

या कामगिरीबद्दल बीड जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष इसाक शेख ,सचिव श्री महेश घुले, उपाध्यक्ष रमेश सानप, कोषाध्यक्ष श्री हरिभाऊ बांगर ,कार्याध्यक्ष नितीन येळवे कारागृह पोलीस तसेच प्रशिक्षक शोएब खाटीक ,प्रशिक्षक अशोक चौरे सर, मार्गदर्शन भगवानराव बागलाने,श्री शिवराज देवगुडे साहेब,साईनाथ राजे (जालना), बाळासाहेब जाधव (सरपंच लिंबागणेश), किरण जाधव,दिलीप ताठे, मुकुंद घोडके सर, अनिरुद्ध बहीर सर, महादेव नरवडे सर, मंडळाचे सर्व राष्ट्रीय – राज्यस्तरीय रग्बी खेळाडू , राष्ट्रीय पंच संभाजी गिरे,इतर सर्व पदाधिकारी आणि समस्त मोरया क्रीडा मंडळ परिवार बीड आदींनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077